रविवार दि. ०६ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ०६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद माने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# गणेशोत्सव मंडळांना मनपाचा १७ कलमी नियमावलीचा इशारा

## परवानगीशिवाय मंडप, कमान उभारल्यास कारवाई; अनधिकृत वीजजोडणी, ध्वनिप्रदूषण, अस्वच्छता व वाहतुकीला अडथळा ठरल्यास दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी १७ कलमी नियमावली जाहीर केली असून, उत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्था, स्वच्छता, वाहतूक, अग्निसुरक्षा आणि पर्यावरणाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. परवानगीशिवाय गणेशमूर्तीची स्थापना, मंडप अथवा कमान उभारल्यास संबंधित मंडळ, पदाधिकारी किंवा आयोजकांविरुद्ध दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्याचा इशारा महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे.

महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या स्वाक्षरीने जाहीर करण्यात आलेल्या आवाहनानुसार, सार्वजनिक ठिकाणी गणेशमूर्तीची स्थापना, मंडप, स्वागत कमान, व्यासपीठ, जाहिरात फलक किंवा अन्य तात्पुरती रचना उभारण्यापूर्वी जालना शहर महानगरपालिका, पोलीस प्रशासन, वाहतूक शाखा, अग्निशमन विभाग, वीज वितरण कंपनी तसेच अन्य संबंधित सक्षम प्राधिकरणांची आवश्यक पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

परवानगी अर्जासोबत सादर केलेल्या जागेच्या आराखड्यानुसारच मंडप उभारावा आणि परवानगीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे पालन करावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

मंडपामुळे रस्ता, पदपथ, चौक अथवा सार्वजनिक मार्ग बंद होणार नाही, याची मंडळांनी विशेष दक्षता घ्यावी. पादचारी तसेच रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने आणि अन्य अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, अशा पद्धतीने मंडपाची उभारणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



रस्ता, पदपथ, दुभाजक, पथदिवे, झाडे, जलवाहिनी, मलनिस्सारण वाहिनी किंवा अन्य सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्यास मनाई करण्यात आली आहे. मंडप उभारताना खड्डे खोदून रस्ता अथवा पदपथ खराब केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून, झालेल्या नुकसानीची भरपाईही संबंधित मंडळाकडून वसूल केली जाणार आहे.

गणेश मंडप परिसरात दररोज स्वच्छता राखणे बंधनकारक करण्यात आले आहे. ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे जमा करून तो महानगरपालिकेच्या अधिकृत कचरा संकलन व्यवस्थेकडे देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रस्त्यावर, नाल्यात, मोकळ्या जागेत किंवा जलस्रोतांमध्ये कचरा, निर्माल्य, प्लास्टिक, थर्माकोल अथवा अन्नपदार्थ टाकू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे. फुले, हार व पूजासाहित्य स्वतंत्र निर्माल्य कलशात जमा करावे. तलाव, विहीर, नाला किंवा अन्य जलस्रोतांमध्ये निर्माल्य अथवा सजावटीचे साहित्य टाकण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

गणेशमूर्ती पर्यावरणपूरक असावी तसेच नैसर्गिक रंगांचा वापर करून तयार केलेली असावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शासनाने प्रतिबंधित केलेल्या एकदाच वापरावयाच्या प्लास्टिक वस्तूंचा वापर करू नये. सजावटीसाठी पर्यावरणपूरक आणि पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मंडपासाठी संबंधित वीज वितरण कंपनीकडून अधिकृत तात्पुरती वीजजोडणी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. अनधिकृत आकडे किंवा हुक टाकून वीज घेणे अथवा धोकादायक पद्धतीने वीजपुरवठा करणे टाळावे. विद्युत जोडणी केवळ परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडूनच करून घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

गणेश मंडपांमध्ये प्रमाणित अग्निशामक यंत्रे, वाळूच्या बादल्या आणि आपत्कालीन निर्गमन मार्ग उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मंडपात ज्वलनशील पदार्थ साठवू नयेत. स्वयंपाकाची व्यवस्था असल्यास अग्निशमन विभागाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी ध्वनिक्षेपक किंवा ध्वनिवर्धक यंत्रणा वापरण्यापूर्वी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगीमध्ये नमूद केलेल्या वेळा आणि ध्वनिमर्यादेचे पालन करावे लागणार आहे. रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये आणि शासनाने घोषित केलेल्या शांतता क्षेत्रांमध्ये लागू असलेल्या नियमांचे विशेषतः पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गणेशोत्सव काळात शांतता, सामाजिक सलोखा आणि सार्वजनिक सुव्यवस्था कायम ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही धर्म, पंथ, जात, व्यक्ती अथवा समुदायाच्या भावना दुखावतील असे देखावे, फलक, घोषणा, भाषणे, गाणी किंवा सोशल मीडिया संदेश प्रसारित करू नयेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

मंडप परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन योग्य नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार स्वयंसेवक नियुक्त करावेत. महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी.

मंडपातील विद्युत उपकरणे, सीसीटीव्ही व्यवस्था तसेच प्रवेश व निर्गमन मार्गांची नियमित तपासणी करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

**जाहिरात फलक व कमानींवरही नियंत्रण**

महानगरपालिकेची परवानगी न घेता जाहिरात फलक, बॅनर, होर्डिंग, कमानी किंवा झेंडे लावता येणार नाहीत. जाहिराती अथवा फलकांमुळे वाहतूक चिन्हे, सीसीटीव्ही कॅमेरे, पथदिवे किंवा वाहनचालकांची दृश्यता बाधित होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

श्रीगणेश आगमन व विसर्जन मिरवणुकीसाठी पोलीस आणि वाहतूक प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. प्रशासनाने निश्चित केलेला मार्ग, वेळ, ध्वनिमर्यादा आणि विसर्जनस्थळ यांचे पालन करावे लागणार आहे.

मिरवणुकीदरम्यान *(पान २ वर)*

# अल्प पावसाने खरीप पिके संकटात; तातडीने पंचनामे करून भरपाई द्या

## परतूर-मंठ्यासह जालना जिल्ह्यातील बाधित क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याची बबनराव लोणीकरांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**परतूर । प्रतिनिधी**

परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण जालना जिल्ह्यात यंदा अत्यल्प पावसामुळे खरीप हंगाम धोक्यात आला असून, सोयाबीन, कापूस, मूग, उडीद आणि तूर या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक मंडळांमध्ये केवळ १३ ते २० टक्के पाऊस झाल्याने शेतांमधील पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीनला फुलोरा आणि शेंगा न आल्याने उत्पादनाची शक्यता जवळपास संपुष्टात आली आहे. या पार्श्वभूमीवर तातडीने प्रत्यक्ष शेतपातळीवर पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीक विमा आणि शासनाची मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. लोणीकर यांनी शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र पाठवून परतूर-मंठ्यासह जालना जिल्ह्यातील अत्यल्प पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधले आहे.

यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीपासूनच पावसाची स्थिती अत्यंत प्रतिकूल राहिली आहे. अनेक मंडळांमध्ये अपेक्षित पावसाच्या तुलनेत केवळ १३ ते २० टक्के पाऊस झाल्याचे लोणीकर यांनी पत्रात नमूद केले आहे. पावसातील मोठ्या खंडामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला असून पिकांच्या वाढीवर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे.

विशेषतः सोयाबीन पिकाला पुरेसा पाऊस न मिळाल्याने अनेक शेतांमध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही. अनेक ठिकाणी सोयाबीनला फुलोरा व शेंगा न आल्याने उत्पादनाची शक्यता अत्यल्प राहिली आहे. कापूस, मूग, उडीद आणि तूर या पिकांनाही पावसाच्या कमतरतेचा मोठा फटका बसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

बबनराव लोणीकर यांनी वाटूर, केंधळी आणि पाकणी परिसरातील शेतांची स्वतः पाहणी केल्याचे पत्रात नमूद केले आहे. या पाहणीदरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.



शेतकऱ्यांनी खरीप पिकांसाठी बियाणे, खते, कीटकनाशके, औषधे तसेच मशागतीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून हंगामाची तयारी केली. मात्र, पावसाने साथ न दिल्याने संपूर्ण हंगाम हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ पीक नुकसानीपुरता मर्यादित नसून हजारो शेतकरी कुटुंबांच्या *(पान २ वर)*

# जालना महानगरपालिकेत तेरा वर्षांनी शिक्षक दिन उत्साहात साजरा

## शिक्षक-शिक्षिकांचा शाल व ट्रॉफी देऊन सन्मान; महापालिका शिक्षकांच्या अडीअडचणींत सदैव सोबत- सभापती भाग्यश्री जोगस

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने तब्बल तेरा वर्षांनंतर शिक्षक दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) दुपारी ४ वाजता महानगरपालिकेच्या अटल बिहारी वाजपेयी सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये कार्यरत शिक्षक, शिक्षिका व मुख्याध्यापकांचा शाल व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षण-विद्युत सभापती सौ. भाग्यश्री जोगस यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे महानगरपालिका शाळांमधील शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.




कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शैक्षणिक कार्य करणाऱ्या शिक्षक-शिक्षिका व मुख्याध्यापकांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. आपल्या कार्याची दखल घेत सन्मान करण्यात आल्याने शिक्षकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्र मादरम्यान महानगरपालिका शाळांच्या शैक्षणिक कामकाजासंदर्भात शिक्षकांनी विविध माहिती मांडली. शाळांमध्ये सुरू असलेले उपक्रम, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करण्यात येणारे प्रयत्न तसेच दैनंदिन कामकाजादरम्यान येणाऱ्या अडचणी याबाबत शिक्षकांनी आपले विचार व्यक्त केले. काही शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिक्षक दिनाच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी अनेक शिक्षकांनी तब्बल तेरा वर्षांनंतर महानगरपालिकेच्या माध्यमातून शिक्षक दिनाचा अशा प्रकारे उत्साहात कार्यक्रम आयोजित झाल्याचे सांगितले. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल शिक्षकांनी *(पान २ वर)*

# तुमसे ना हो पायेगा; ४७ हजार कोटींच्या घोषणेचा हिशेब द्या...!

## मराठवाड्याच्या विकासाच्या अनुशेषावर शिवसेनेचे आज जालन्यात लक्षवेधी आंदोलन- जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या विकासासाठी २०१६ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४७ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची घोषणा केली होती. मात्र, या घोषणेच्या तुलनेत प्रत्यक्षात तीन हजार कोटी रुपयांचीही विकासकामे झाली नसल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव यांनी केला. मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष आणि सरकारच्या घोषणांचा जाब विचारण्यासाठी 'तुमसे ना हो पयेगा' या उपरोधिक घोषवाक्याखाली शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्यात



येणार असल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. रविवार, ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता गांधी चमन येथे हे लक्षवेधी आंदोलन होणार असून, माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे आंदोलनास उपस्थित राहणार आहेत. या आंदोलनाची सुरुवात जालना येथून होत असून, १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दिवशी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची सांगता करण्यात येणार असल्याचे श्रीवास्तव यांनी सांगितले. २०१६ मध्ये मंत्री मंडळाची विशेष बैठक संभाजीनगर येथे मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी ४७ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांची घोषणा करण्यात आली होती. मात्र, दहा वर्षांचा कालावधी उलटूनही अपेक्षित विकास झालेला नाही. जालना जिल्ह्यातील विविध विकासकामेही अद्याप प्रलंबित असून, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, ड्रायपोर्ट येथे पायाभूत सुविधांचा अनुशेष, अंबड येथील मत्स्योदरी मंदिर साठी ४० कोटी, अंबड येथील पाणीपुरवठ्यासाठी ३५ कोटी तसेच जालना येथील १५ एमएलडी जलशुद्धीकरणासाठी ५६ कोटी, जाफराबाद येथील पाणीपुरवठा साठी ४८ कोटी निम्न दुधना प्रकल्पासाठी ७ कोटी ८५ लाख, आयटीआय साठी १० कोटी, स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय दगडाबाई शेळके यांच्या स्मारकासाठी ५ कोटी रुपये अशा विविध विकास कामांसाठी घोषणांचा पाऊस पाडला होता परंतु यातील एकाही काम पूर्णत्वाकडे नेले नाही असा आरोप देखील त्यांनी या पत्रकार परिषदेत केला. जालना *(पान २ वर)*

# जालन्यात रंगणार दोन दिवसीय 'लोकसंगीत महोत्सव'

## ९ व १० सप्टेंबर रोजी जे.ई.एस. महाविद्यालयात लोकसंगीताची सुरेल मेजवानी; विविध लोककलावंतांचे सादरीकरण

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंगीत परंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने दोन दिवसीय 'लोकसंगीत महोत्सवा'चे आयोजन जालना येथे करण्यात आले आहे. बुधवार, दि. ९ सप्टेंबर आणि गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी सायं. ५.३० वाजता जे.ई.एस. कॉलेज, जालना येथे हा महोत्सव होणार आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी विनल देशमुख, रमानंद उगळे,



अश्विनी मिठे आणि शाहीरा माधवी माळी यांच्या लोकसंगीत व लोक कलाविष्कारांचे सादरीकरण होणार आहे. तर गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी श्रावणी महाजन, कुणाल वरळे, सानिका शिर्के आणि चेतन लोखंडे हे कलाकार आपल्या सादरीकरणातून रसिकांना लोकसंगीताची सुरेल अनुभूती देणार आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि लोकजीवनाशी घट्ट नाते असलेल्या लोकसंगीतामध्ये विविध भागांतील परंपरा, बोलीभाषा, जीवनशैली, सामाजिक वास्तव आणि सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन घडते. या समृद्ध लोकपरंपरेला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच नव्या पिढीला लोकसंगीताची ओळख व्हावी, या उद्देशाने 'लोकसंगीत महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री *(पान २ वर)*

# संपादकीय...

## ‘ब फायनल’नंतरही प्रश्न संपले नाहीत; आता सत्याची अंतिम कसोटी न्यायालयात

जालना शहरातील सर्व्हे क्रमांक ५५४ मधील जमिनीच्या वादातून दाखल झालेल्या गुन्ह्याला पोलिस तपासानंतर ‘ब फायनल’ अहवाल दाखल झाल्याने नवे वळण मिळाले आहे. संध्या राजेंद्र डागा यांनी पत्रकार परिषदेत या अहवालाचा आधार घेत आपल्यावरील आरोप निराधार ठरल्याचा दावा केला आहे. दुसरीकडे, या अहवालावर अंतिम शिक्कामोर्तब अद्याप न्यायालयाने केलेले नसल्याने कायदेशीरदृष्ट्या प्रकरण पूर्णपणे संपले आहे, असे म्हणणे घाईचे ठरेल. याच ठिकाणी या प्रकरणाचे गांभीर्य समजून घेणे आवश्यक आहे. ‘ब फायनल’ हा पोलिस तपासाचा निष्कर्ष आहे; तो न्यायालयाचा अंतिम निकाल नाही. ही बाब स्पष्ट ठेवूनच या प्रकरणाकडे पाहिले पाहिजे. गुन्हा दाखल होणे म्हणजे दोष सिद्ध होणे नव्हे

कुठल्याही व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल झाला म्हणजे त्या व्यक्तीने गुन्हा केला, असे कायद्याच्या दृष्टीने मानता येत नाही. गुन्ह्याची नोंद ही तपासाची सुरुवात असते. तपास यंत्रणा तक्रारीतील आरोप, कागदपत्रे, साक्षीदारांचे जबाब आणि इतर पुरावे तपासते. त्यातून गुन्हा सिद्ध करण्याइतका पुरावा उपलब्ध आहे किंवा नाही, याचा निष्कर्ष पोलिस तपासात निघतो. या प्रकरणात पोलिसांनी ‘ब फायनल’ अहवाल दाखल केला आहे, ही निश्चितच महत्त्वाची बाब आहे. मात्र त्या अहवालावर संबंधित न्यायालय काय निर्णय घेते, हे त्याहून महत्त्वाचे आहे.

म्हणूनच एका टोकाला जाऊन तक्रारदाराला दोषी ठरवणे किंवा दुसऱ्या टोकाला जाऊन आरोपींना न्यायालयीनदृष्ट्या निर्दोष घोषित करणेदोन्ही टाळले पाहिजे. ‘ब फायनल’ म्हणजे नेमके काय? सामान्य नागरिकांच्या मनात या शब्दाबाबत अनेक गैरसमज असतात. पोलिस तपासात आरोपांना पुरेसा आधार मिळाला नाही किंवा तक्रारीनुसार गुन्हा सिद्ध होत नसल्याचे तपास यंत्रणेचे मत असल्यास संबंधित अहवाल न्यायालयासमोर सादर केला जाऊ शकतो. मात्र त्यानंतर न्यायालय तक्रारदाराची बाजू, पोलिसांचा तपास आणि उपलब्ध कागदपत्रे विचारात घेते. त्यामुळे ‘पोलिसांनी ब फायनल दाखल केला’ आणि ‘न्यायालयाने आरोपी निर्दोष ठरवले’ या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. या फरकाची जाणीव ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आता खरी कसोटी न्यायालयीन प्रक्रियेची या प्रकरणात ‘ब फायनल’ अहवाल न्यायालयात दाखल झाल्याचे सांगण्यात आले आहे. आता पुढील प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेतून स्पष्ट होणार आहेत. न्यायालय हा अहवाल स्वीकारते का?

तक्रारदाराला त्यावर हरकत घेण्याची संधी काय मिळते?

तक्रारदाराकडून कोणते पुरावे सादर केले जातात?

तपासातील निष्कर्ष आणि न्यायालयासमोर उपलब्ध कागदपत्रे यांचे मूल्यांकन कसे होते? या सर्व प्रश्नांची उत्तरे न्यायालयीन प्रक्रियेतूनच मिळतील. त्यामुळे ‘ब फायनल’नंतर एका पक्षाला विजय आणि दुसऱ्या पक्षाला पराभव घोषित करण्यापेक्षा न्यायालयाचा अंतिम आदेश येईपर्यंत संयम ठेवणे अधिक योग्य ठरेल. जमिनीचा वाद आणि फौजदारी गुन्हामूलभूत प्रश्न

या प्रकरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सर्व्हे क्रमांक ५५४ या मालमत्तेशी संबंधित वाद. जर एखादा मालमत्ता वाद दिवाणी किंवा महसुली न्यायालयात आधीपासून सुरू असेल, तर त्याच वादाचे फौजदारी प्रकरणात रूपांतर करण्याचा प्रयत्न झाला का, हा प्रश्न तपासण्याची गरज आहे.

परंतु त्याच वेळी मालमत्ता वाद आहे म्हणून त्यातून उद्भवणारा कोणताही संभाव्य फौजदारी गुन्हा आपोआप नाकारता येत नाही. यामुळे या प्रकरणात सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे दिवाणी वाद आणि फौजदारी आरोप यांची स्वतंत्र कायदेशीर कसोटी. मालकीचा प्रश्न कोण ठरवणार? दस्तऐवज वैध आहेत की नाही, हे कोणत्या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येते?

फसवणूक किंवा बनावट दस्तऐवजाचा स्वतंत्र आरोप असल्यास त्याचा पुरावा काय? या प्रश्नांची उत्तरे केवळ पत्रकार परिषदेत नव्हे, तर संबंधित न्यायालयीन आणि अधिकृत कागदपत्रांतून मिळाली पाहिजेत. आरोप गंभीर असतील तर पुरावेही तितकेच गंभीर हवेत फसवणूक, बनावट दस्तऐवज तयार करणे किंवा कट रचणे हे गंभीर आरोप आहेत. अशा आरोपांमुळे संबंधित व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा, व्यवसाय आणि कौटुंबिक जीवन प्रभावित होऊ शकते. म्हणूनच अशा आरोपांकडे हलक्याफुलक्या पद्धतीने पाहता येणार नाही.

आरोप करणाऱ्याची जबाबदारी आहे की त्यांच्याकडे ठोस आधार असावा. आरोप ज्यांच्यावर झाले त्यांनाही तपासात सहकार्य करून आपली बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे.

आणि तपास यंत्रणेची जबाबदारी आहे की, उपलब्ध पुरावे निष्पक्षपणे तपासून न्यायालयासमोर वस्तुनिष्ठ अहवाल ठेवावा. ही तीनही कडी मजबूत असेल तरच न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम राहतो. पोलिस तपासावर प्रश्न असल्यास न्यायालयीन मार्ग खुला ‘ब फायनल’ अहवालामुळे तक्रारदाराच्या सर्व कायदेशीर संधी संपत नाहीत. संबंधित न्यायालयीन प्रक्रियेत तक्रारदाराला आपली बाजू मांडण्याची संधी असू शकते.

याचा अर्थ असा की पोलिस तपासाशी असहमती असल्यास त्यासाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध आहे. म्हणून या प्रकरणातील कोणत्याही पक्षाने माध्यमांमध्ये परस्पर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा न्यायालयीन प्रक्रियेवर विश्वास ठेवणे अधिक हिताचे आहे. प्रतिष्ठेचा प्रश्नही गंभीर संध्या डागा यांनी पत्रकार परिषदेत गंभीर आरोपांमुळे आपली आणि कुटुंबीयांची प्रतिष्ठा दुखावल्याचे सांगितले आहे. ही बाबही दुर्लक्षित करता येणार नाही.

एखाद्या व्यक्तीविरुद्ध गंभीर गुन्ह्याचा आरोप झाला की समाजमाध्यमे आणि सार्वजनिक चर्चेत त्या व्यक्तीला दोषी ठरवण्याची घाई होते. मात्र कायद्याच्या दृष्टीने दोष सिद्ध होईपर्यंत व्यक्तीला आरोपी म्हणूनच पाहिले जाते. म्हणून माध्यमे, सोशल मीडिया वापरकर्ते आणि सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनीही अशा प्रकरणात संयम पाळणे आवश्यक आहे.

आरोपांची बातमी करता येते; पण आरोपांना अंतिम सत्याचा दर्जा देता येत नाही. त्याचप्रमाणे पोलिसांचा ‘ब फायनल’ अहवाल प्रसिद्ध करता येतो; पण त्याला न्यायालयीन निर्दोषत्वाचा अंतिम निकाल म्हणून मांडणेही योग्य नाही.

खोटी तक्रार असेल तर त्याचीही कायदेशीर कसोटी

डागा यांनी तक्रार खोटी, निराधार आणि दिशाभूल करणारी असल्याचा दावा केला आहे. तपास अधिकाऱ्यांनी तक्रारदाराविरुद्ध कायदेशीर कारवाईचा विचार करण्याची विनंती न्यायालयास केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

जर न्यायालयीन प्रक्रियेत तक्रार जाणीवपूर्वक खोटी असल्याचे सिद्ध झाले, तर कायद्यात उपलब्ध उपायांचा वापर करता येऊ शकतो.

# अदिती रायची इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत तालुक्यात प्रथम

**दत्ता देशमुख**

हिंदू समाज संस्था संचलित कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी अदिती नीरज राय हिने तालुकास्तरीय इंग्लिश एलोक्युशन (वक्तृत्व) स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे तिची आगामी जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद, शासकीय व निमशासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




इयत्ता नववी व दहावीच्या गटातून झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत अदिती राय हिने आपल्या प्रभावी वक्तृत्वाने परीक्षकांची मने जिंकत प्रथम क्रमांक मिळविला. मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी प्रदान करण्यात आली व सत्कार करण्यात आला. अदितीला उपक्रमशील शिक्षक संदीप इंगोले यांचे मार्गदर्शन लाभले.

तिच्या या यशाबद्दल हिंदू समाज संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजीव देशपांडे, सचिव चंद्रशेखर वाघमारे, उपाध्यक्ष जगदीश बडवे, भगवान धोत्रे, संचालक अरुण किनगावकर, डॉ. विनायक दसरे, कुमारजी देशपांडे, रावसाहेब अवघड, नितीन कोळेश्वर, जुगलकिशोर भक्कड तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती मीनाक्षी कुलकर्णी यांनी तिचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. अदितीच्या या यशाबद्दल विद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी तिचे कौतुक केले असून, जिल्हास्तरीय स्पर्धेतही ती निश्चितच उज्ज्वल यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पान १ व ४ वरुन...

## गणेशोत्सव मंडळांना...

धोकादायक कृत्ये, शस्त्रप्रदर्शन, फटाक्यांचा असुरक्षित वापर अथवा वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या कोणत्याही कृतीस परवानगी दिली जाणार नाही. गणेशोत्सव संपल्यानंतर निर्धारित मुदतीत मंडप, कमानी, फलक आणि अन्य साहित्य संबंधित मंडळांनी स्वतः काढून टाकावे. त्यानंतर परिसराची संपूर्ण स्वच्छता करून जागा पूर्ववत करणे मंडळांची जबाबदारी राहणार आहे.

तसेच महानगरपालिका, पोलीस, वीज वितरण कंपनी, अग्निशमन विभाग आणि अन्य संबंधित विभागांकडून प्राप्त झालेल्या सर्व परवानग्यांच्या प्रती मंडपाच्या दर्शनी भागात लावाव्यात. तपासणी अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास या परवानग्या तात्काळ सादर कराव्यात, असेही निर्देश देण्यात आले आहेत. बिनापरवानगी गणेशमूर्तीची स्थापना, मंडप किंवा कमान उभारणे, अतिक्रमण करणे, अनधिकृत वीजजोडणी घेणे, अस्वच्छता निर्माण करणे, ध्वनिप्रदूषण करणे, वाहतुकीला अडथळा निर्माण करणे किंवा कायदा-सुव्यवस्थेचा भंग करणे आढळल्यास संबंधित मंडळ, पदाधिकारी अथवा आयोजकांविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ तसेच लागू पोलीस, पर्यावरण, विद्युत, अग्निसुरक्षा, ध्वनिप्रदूषण आणि सार्वजनिक मालमत्ता संरक्षणविषयक कायदे व शासन आदेशांनुसार कारवाई केली जाणार आहे. गरज भासल्यास परवानगी रद्द करणे, अनधिकृत मंडप अथवा साहित्य हटविणे, त्यासाठी झालेला खर्च संबंधितांकडून वसूल करणे, अनधिकृत वीजपुरवठा खंडित करणे आणि संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कारवाईही केली जाऊ शकते, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. गणेशोत्सव हा उत्साह, श्रद्धा आणि सामाजिक एकोपा जपणारा सण असल्याने सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनाच्या नियमांचे पालन करून उत्सव पर्यावरणपूरक, स्वच्छ, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करावा. प्रशासनाला सहकार्य करून ‘स्वच्छ जालना-सुंदर जालना, सुरक्षित गणेशोत्सव’ हा संदेश प्रत्यक्षात आणावा, असे आवाहन जालना शहर महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी केले आहे.

## अल्प पावसाने...

उदरनिर्वाहाचा आणि जगण्याचा प्रश्न बनला असल्याचे लोणीकर यांनी स्पष्ट केले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी प्रशासनाने विलंब न करता प्रत्यक्ष शेतपातळीवर पंचनामे सुरू करावेत, अशी आग्रही मागणी लोणीकर यांनी केली आहे. जिल्हाधिकारी यांनी शासनाच्या स्वतंत्र आदेशाची वाट न पाहता परिस्थितीचा प्राथमिक अहवाल शासनाकडे सादर करावा आणि त्यानंतर बाधित क्षेत्रातील पिकांचे प्रत्यक्ष पंचनामे तातडीने सुरू करावेत, असे त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. ज्या क्षेत्रात ३३ टक्क्यांपेक्षा अधिक पीक नुकसान झाले आहे, त्या क्षेत्रातील पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पीक विमा, नुकसानभरपाई आणि शासकीय मदत तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

पीक विमा भरलेल्या पात्र शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळावा, तसेच शासनाच्या निकषांनुसार विमा न भरलेल्या परंतु बाधित व पात्र शेतकऱ्यांनाही उपलब्ध असलेल्या शासकीय मदतीपासून वंचित ठेवू नये, अशी भूमिका लोणीकर यांनी मांडली आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही मदत मिळण्यास विलंब झाला, तर हा प्रश्न विधानसभेत अत्यंत ठामपणे उपस्थित करणार असल्याचा इशारा बबनराव लोणीकर यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत पाठपुरावा थांबवणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आता प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागाचा आढावा घेऊन पंचनाम्याची कार्यवाही सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात लोणीकर यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी पीक वाचविण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले आहे. मात्र, पावसाने दगा दिल्यामुळे त्यांच्यासमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची गरज आहे.

‘‘पंचनामे तातडीने करा, नुकसान निश्चित करा आणि भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा. संकटाच्या काळात शासन निर्णय घेण्यात विलंब करणार नाही,’’ अशी अपेक्षाही लोणीकर यांनी व्यक्त केली आहे.

या मागणीचे पत्र महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री दत्तामामा भरणे, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त, जालना जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच जालना, परतूर आणि अंबडचे उपविभागीय अधिकारी यांना माहितीसाठी पाठविण्यात आले आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील अत्यल्प पावसामुळे बाधित झालेल्या खरीप पिकांचे पंचनामे, नुकसानभरपाई आणि पीक विम्याच्या मदतीबाबत आता प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे जिल्ह्यातील शेतकरी आणि कृषी क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## शिक्षक-शिक्षिकांचा...

शिक्षण सभापती भाग्यश्री जोगस यांचे आभार मानले. यावेळी बोलताना शिक्षण-विद्युत सभापती सौ. भाग्यश्री जोगस म्हणाल्या की, ‘‘शिक्षक हा समाज घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असतो. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याचे काम शिक्षक करतात. शिक्षकांबद्दल असणारा आदर, कृतज्ञता आणि आभार व्यक्त करण्याचा आजचा दिवस आहे.‘‘

महानगरपालिकेच्या शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांच्या योगदानाचा गौरव व्हावा, त्यांच्या कामाला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर सकारात्मक पद्धतीने काम करता यावे, यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सभागृह नेते तथा गटनेते महेशराव निकम उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी महानगरपालिका शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी महापालिका प्रशासन व पदाधिकारी त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. शिक्षक हे समाजाच्या भावी पिढीला दिशा देण्याचे काम करतात. त्यामुळे त्यांच्या समस्या आणि अडचणी समजून घेऊन त्यावर योग्य तोडगा काढण्याची भूमिका महापालिकेची राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षण उपायुक्त सुप्रियाताई चव्हाण यांनी केले. त्यांनी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सुरू असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची तसेच शिक्षकांच्या योगदानाची माहिती दिली. शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांचा सन्मान करण्यामागील भूमिका त्यांनी स्पष्ट केली. या कार्यक्रमामुळे महानगरपालिकेच्या शिक्षकांना एकत्र येऊन आपल्या कार्याचा आढावा घेण्याची तसेच शाळांशी संबंधित विविध विषयांवर विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाच्या शेवटी महानगरपालिका शाळांमधील सर्व शिक्षक-शिक्षिका व मुख्याध्यापकांनी शिक्षण-विद्युत सभापती भाग्यश्री जोगस यांचे आभार मानले. तेरा वर्षांनंतर शिक्षक दिनाचा कार्यक्रम उत्साहात आयोजित केल्याबद्दल शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

## तुमसे ना हो...

जिल्ह्यातील विकासकामांचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी शासनाने ठोस निधी उपलब्ध करून देऊन कामे मार्गी लावावीत. केवळ घोषणांवर विकासाचा गवगवा न करता प्रत्यक्षात किती कामे झाली, किती निधी खर्च झाला आणि किती कामे अद्याप प्रलंबित आहेत, याचा हिशेब सरकारने जनतेसमोर मांडावा, अशी मागणी श्रीवास्तव यांनी केली. यंदा मागील दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.आसमानी-सुलतानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला असून सोयाबीन, मका आणि ऊस या पिकांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांसाठी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली. मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्या सोबतच जालना जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी सरकारचे लक्ष वेधणे हा आंदोलनाचा प्रमुख उद्देश असल्याचे श्रीवास्तव यांनी स्पष्ट केले. या आंदोलनात जास्तीत जास्त शिवसैनिकांनी

सहभागी व्हावे तसेच सरकारच्या विरोधातील समविचारी पक्ष व संघटनांनीही आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव,महेश नळगे,जिल्हा संघटक भानुदास घुगे,उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ,भगवान कदम,हनुमान धांडे, माधवराव कदम,रमेश गव्हाड, परमेश्वर जगताप, अशोक आघाव,महिला आघाडी जिल्हा संघटक रूपम घुगे, शहरप्रमुख दीपक रणनवरे,महेश पुरोहित, तालुकाप्रमुख कैलास पुंगले,कुंडलिक मुट्ठे, दिनेश काकडे,गणेश दराडे, जयप्रकाश चव्हाण, रामेश्वर फंड,सुभाष राऊत,यांच्यासह युवासेना जिल्हाधिकारी गणेश काळे यांनी केले आहे.

## जालन्यात रंगणार...

ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विविध लोककला, लोकसंगीत, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाच्या जतन, संवर्धन व प्रसारासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या महोत्सवास प्रवेश विनामूल्य आहे. जालना व परिसरातील रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दोन दिवसीय ‘लोकसंगीत महोत्सवा’चा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडकर यांनी केले आहे.

## तालुक्यातील विविध...

अधिकारी मुकेश माकोडे,ज्येष्ठ शिवसैनिक तथा माजी सरपंच विष्णू पा.म्हस्के,

माजी प.स.सदस्य रमेश गायकवाड, चंदू पा.शिंदे,शिवाजी म्हस्के, योगेश कापसे,संतोष जाधव, भागवत घोडके, गणपत बनकर, प्रल्हाद बनकर,प्रभाकर जंजाळ, विष्णु लोखंडे,गोविंदा माकोडे, अमोल नरवाडे,विमोचन बोरसे नंदकिशोर भालके,सलमान पठाण, नागोराव बंगाळे,परमेश्वर गायकवाड,दीपक तायडे,दगडूबा मोकळे, नंदकिशोर गायकवाड, सुभाषराव परिहार, गणेश तुपे, सुलतान कुरेशी,नितीन परिहार, रामदास झोरे,संदीप परिहार,विष्णू उबाळे,सुभाष काळे,सांडू फदाट, यासह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## शिक्षक दिनानिमित्त...

आला. तसेच जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणारी अदिती नीरज राय हिचा विशेष सत्कार करण्यात आला. रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालयाची विद्यार्थिनी श्रेया मालसमींदर हिने इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल तिचाही गौरव करण्यात आला.

याशिवाय श्रीराम वाचनालय येथे आयोजित संस्कृत स्पर्धेत प्रथम, द्वितीय व उत्तेजनार्थ क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांवर बक्षिसांचा वर्षाव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. संस्थेचे सचिव चंद्रशेखर वाघमारे यांचे वडील नारायणराव वाघमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सर्व शिक्षकांना भेटवस्तू तसेच शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे यांनी शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, ‘‘जगामध्ये शिक्षक हा सर्वात प्रामाणिक व्यक्ती असला पाहिजे. कारण शिक्षकच देशाची भावी पिढी घडविण्याचे कार्य करतो. त्यामुळे शिक्षकांनी आपल्या कार्याशी प्रामाणिक राहिले पाहिजे.’’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ‘‘ ’’ या विचाराचा संदर्भ देत त्यांनी जात-पात व भेदभाव न करता प्रत्येक विद्यार्थ्याला समानतेने ज्ञानदान करणे हे शिक्षकांचे प्रामाणिक कर्तव्य असल्याचे सांगितले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्रीमती अनघा जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नाते, शिक्षणाचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांनी सातत्याने ज्ञानार्जन करण्याची आवश्यकता यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप अध्यक्ष डॉ. विनायक दसरे यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाला. यावेळी विविध विषयांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. विनायक दसरे म्हणाले की, ‘‘विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांचे वाचन न करता विविध ग्रंथांचे वाचन केले पाहिजे. शिक्षकांनीही आपल्या ज्ञानामध्ये सातत्याने वाढ केली पाहिजे. शिक्षकांचे ज्ञान जितके समृध्द असेल, तितके विद्यार्थी अधिक सक्षमपणे घडतील. त्यामुळे ज्ञानाचा उपयोग समाज आणि देशाच्या उन्नतीसाठी झाला पाहिजे.’’

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिरे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संदीप इंगोले यांनी केले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करण्याची सुंदर परंपरा जपली गेली.

## जालन्यात ब्राह्मण...

यावेळी अंबाजोगाई पेशवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी प्रा. राहुल कुलकर्णी, डॉ महेश अकोलकर, योगेश जानतीकर ,संजय देशपांडे, मधुसूदन दंडारे , आर आर जोशी,अरविंद देशपांडे, दिलीप जोशी, ॲड बळवंत नाईक, भूषण जोशी, राहुल यादनिक , अनिल दीक्षित, सिद्धीविनायक मुळे, विलास कुलकर्णी, मंदार कुलकर्णी ,संतोष दानी यांच्यासह समाजातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. ‘‘समाजाच्या मागण्या आंदोलनाच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे; मात्र संवाद आणि समन्वयातून त्यावर सकारात्मक तोडगा काढणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीत ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर निश्चितपणे सकारात्मक चर्चा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करू,’’ असे यावेळी राम कुलकर्णी यांनी सांगितले.

## इस्कॉनतर्फे रथयात्रा...

भगवान श्रीकृष्णाचा जन्म होत असताना सर्व देवी-देवता प्रार्थनेसाठी उपस्थित झाले होते. भगवान श्रीकृष्ण हे पुरुषांमध्ये उत्तम पुरुष आहेत. म्हणून त्यांना पुरुषोत्तम असेही म्हटले जाते. अशा भगवंताची भक्ती व सेवा केल्याने जीवन यशस्वी व सार्थक करण्यास मदत होते, असेही रास गोविंद प्रभू यांनी प्रवचनातून स्पष्ट केले.

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त काढण्यात आलेल्या रथयात्रेला टेंभुर्णीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रथयात्रेदरम्यान भाविकांनी श्रीकृष्णाचा जयजयकार करीत हरिनामाचा गजर केला. याप्रसंगी शालिकराव म्हस्के,

**भगवान श्रीकृष्णाला ५६ विविध पदार्थांचा नैवेद्य**

- श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त भगवान श्रीकृष्णाला ५६ विविध पदार्थांचा नैवेद्य, अर्थात ५६ भोग अर्पण करण्यात आला. भाविकांनी श्रद्धेने विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आणले. या धार्मिक उपक्रमात सहभाग घेतला. यानंतर दूध, मध यासह विविध पवित्र पदार्थांनी भगवान श्रीकृष्णाचा विधिवत अभिषेक करण्यात आला. महाआरतीनंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. भक्ती, श्रद्धा, हरि नामाच्या जयघोषात पार पडलेल्या या सोहळ्याने टेंभुर्णी नगरीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

इस्कॉनचे देवपती प्रभू, लता खांडेभराड, विठ्ठल रांधवन, भारत जोशी, विजय जाधव, ऋतिका खांडेभराड, कैलास सोनसाळे, भरत जोशी, शंकर खरात यांच्यासह इस्कॉनचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## कर्मचारी हितासाठी...

महासंघाच्या संपर्क प्रमुखपदी नरेंद्र जोशी तर प्रसिद्धीप्रमुखपदी भगवान तायड यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच कास्ट्राईब आरोग्य कर्मचारी संघटनेच्या विविध पदांवरही नियुक्त्या करण्यात आल्या. जगदीश सरदार जिल्हा सरचिटणीस, रवि हनवते जिल्हा कार्याध्यक्ष, दिपक गाढवे जिल्हा उपाध्यक्ष, भारत वाघुंबरे जिल्हा उपाध्यक्ष, रणजीत ससाणे जिल्हा उपाध्यक्ष, राहुल वनगुजरे जिल्हा अतिरिक्त सरचिटणीस, अशोक तिडके जिल्हा अतिरिक्त सरचिटणीस, शाम फोके जिल्हा संघटक, प्रवीण इंगळे जिल्हा कोषाध्यक्ष, गीता चौधरी जिल्हा महिला प्रतिनिधी, अंजली खरात जिल्हा महिला प्रतिनिधी, स्नेहा सूर्यवंशी जिल्हा महिला प्रतिनिधी तसेच गजानन देशमुख सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

## धनादेश अनादर...

फिर्यादी कचरूलाल गजरे यांनी फौजदारी न्यायालय, जालना येथे प्रकरण दाखल केले.

या प्रकरणात मा. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे तोंडी तसेच कागदोपत्री पुरावे, तसेच झालेला युक्तिवाद विचारात घेत आरोपी सिताराम उत्तम पवार यांना दोषी ठरविले. त्यानुसार न्यायालयाने एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली असून, तीन महिन्यांच्या आत ५ लाख ८० हजार रुपये दंड व नुकसानभरपाई म्हणून फिर्यादीस देण्याचे आदेश दिले आहेत. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त चार महिने कारावास भोगावा लागणार आहे. या प्रकरणात फिर्यादी पक्षातर्फे ॲड. विजय एस. करंडे व ॲड. प्रशांत एस. कायंदे यांनी काम पाहिले.

# निसर्ग पर्यटनातील... आनंद

''आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे...'' बालकवींच्या या ओळी आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत, शाळेच्या पुस्तकात वाचत आलो आहोत. पण या ओळींचा खरा, जिवंत अर्थ आपल्याला तेव्हा समजतो, जेव्हा आपण शहराच्या गजबजाटातून, सिमेंटच्या जंगलातून बाहेर पडतो. उत्तराखंडच्या त्या पावन, विस्तीर्ण निसर्गछायेत पाऊल ठेवल्यावर हा अनुभव आला.जो मी प्रत्यक्ष अनुभवला. तो सगळ्यांना सांगावा म्हणून हा लेखन प्रपंच.

आज आपल्या सगळ्यांचेच आयुष्य कसे झाले आहे? सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत फक्त एकच धावपळ. अलार्मचा तो कर्कश आवाज, गाडी सापडण्यासाठी धावपळ, ऑफिसच्या डेडलाईन्स आणि उरलेल्या वेळात मोबाईलच्या स्क्रीनवर चाललेली जगाची उठाठेव. या सगळ्या गदारोळात आपण शांतपणे श्वास घेणे आणि स्वतःशी संवाद साधणे पूर्णपणे विसरून गेलो आहोत. हीच शांतता, हाच विसरलेला संवाद मला निसर्गाने नटलेल्या ऋषीकेश आणि मसूरीच्या कुशीत परत मिळाला. निसर्ग हा केवळ आपल्या अवतीभवती असलेला परिसर नाही, तर तो आपल्या आत्म्याला सुखवणारा एक जिवंत आणि अथांग स्त्रोत आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव मला या प्रवासात, मुक्कामात आला. माझ्या या प्रवासाची सुरुवात झाली ती गंगेच्या पवित्र भूमीत, म्हणजेच ऋषीकेशमध्ये. ऋषीकेशमध्ये पाऊल ठेवताच हवेत एक वेगळीच शुद्धता आणि सकारात्मकता जाणवली. तिथल्या डोंगरांच्या मधून वाहणारी गंगेची ती निळीशार, संथ पण तितकीच प्रवाही धारा मनाला एका वेगळ्याच जगात घेऊन जाते. संध्याकाळच्या वेळी जेव्हा मी ऋषीकेशच्या त्रिवेणी घाटावर गंगा आरतीसाठी बसलो होतो, तेव्हाचा अनुभव शब्दात सांगणे अशक्य आहे. शेकडो दिव्यांचा प्रकाश गंगेच्या पाण्यात तरंगत होता, हवेत कापूर आणि उदबत्त्यांचा सुवास दरवळत होता आणि शेकडो कंठांतून निघणारा घंटानाद आणि मंत्रोच्चार चालू होता. डोळे बंद करून तिथे बसल्यावर मला जाणवले की, आजपर्यंत मी पैशाने खरेदी करत होतो तो केवळ क्षणिक विरंगुळा होता, खरा आनंद तर या निसर्गाच्या आणि अध्यात्माच्या संगमात शांत बसून राहण्यात आहे. हे प्रकर्षाने जाणवते. ऋषीकेशमध्ये गंगा नदीच्या अगदी काठावर, हिरव्यागार टेकड्यांच्या कुशीत वसलेला स्वामी शिवानंद आश्रम म्हणजेच दिव्य जीवन संघ (डिवाईन लाईफ सोसायटी) हा या प्रवासातील सर्वात शांत आणि अंतर्मुख करणारा टप्पा ठरला. आश्रमाच्या आवारात पाऊल ठेवताच तिथल्या सात्विक, पवित्र आणि अत्यंत शिस्तबद्ध वातावरणाने मनाला एका वेगळ्याच शांततेची प्रचिती दिली. कुप्पू स्वामी म्हणजेच स्वामी शिवानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या या आश्रमात निसर्ग आणि अध्यात्म एकमेकांत विरघळून गेले आहेत. आश्रमाच्या घाटावर बसून गंगेचा संथ प्रवाह पाहत ध्यान धारणा करणे, हा एक अत्यंत अलौकिक अनुभव होता. तिथली ती निशब्द शांतता, ध्यानगृहातील सकारात्मक ऊर्जा आणि संतांचे विचार माणसाला क्षणार्धात अंतर्बाह्य बदलून टाकतात. भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या माझ्या मनाला खऱ्या आनंदाचा आणि साधे जीवन, उच्च विचार ( , ) या तत्त्वाचा खरा अर्थ याच निसर्गरम्य आश्रमात समजला. आमच्या मिरज निवासी सदगुरु ओम मालती




देवी यांचे ते सदगुरु. जवळपास सात ते आठ दिवस आम्ही शिवानंद स्वामींचे आश्रमात होतो. प्रातःकाळी गंगा स्नानाचा लाभ या काळात झाला.

ऋषीकेश पुढचा एक अत्यंत पावन आणि निसर्गरम्य टप्पा म्हणजे नीलकंठेश्वर महादेव मंदिर. ऋषीकेशपासून साधारण ३० /३२ किलोमीटर अंतरावर, दाट जंगलांच्या आणि पहाडांच्या कुशीत हे प्राचीन मंदिर वसलेले आहे. नीलकंठैश्वरा कडे जाण्याचा रस्ता म्हणजे अक्षरशः निसर्गाची एक सुंदर उधळण होती. नागमोडी वळणांच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पसरलेले हिरवेगार डोंगर, खोल दऱ्या आणि मध्येच वाहणारे छोटे-छोटे प्रवाह मनाला तृप्त करत होते. त्या डोंगराळ वाटेने प्रवास करताना जाणवले की, आपल्या पूर्वजांनी, ऋषीमुनींनी ही मंदिरे अशाच निर्मल निसर्गाच्या सानिध्यात का स्थापन केली असावीत! मंदिराच्या परिसरात पोहोचताच तिथल्या घंटांचा नाद, आणि वातावरणात पसरलेली प्रसन्न ऊर्जा मनाला भारावून टाकणारी होती. भगवान शंकराच्या या पावन स्थळी, त्या थंड हवेत आणि अथांग निसर्गाच्या छायेत घेतलेला प्रत्येक श्वास मला आतून समृद्ध करून गेला. ऋषीकेशमध्ये फक्त अध्यात्मच नाही, तर निसर्गाचे एक अद्भूत, साहसी रूपही पाहायला मिळते. लक्ष्मण झुला आणि राम झुलावरून चालताना खाली वाहणारी खळाळती गंगा आणि सभोवतालचे हिरवेगार डोंगर मनाचा थरार वाढवतात. निसर्गाच्या ताकदीची जाणीव होते. पाण्याच्या त्या अथांग प्रवाहात जेव्हा आपण होडीतून प्रवास करतो, तेव्हा सभोवतालचे उंच कडे आपल्याला आपल्या लहान असण्याची जाणीव करून देतात. जेव्हा मी गंगेच्या कडेला असलेल्या पांढऱ्याशुभ्र वाळूवर शांत बसलो, तेव्हा वाऱ्याची एक मंद झुळूक चेहऱ्याला स्पर्श करून गेली. त्या क्षणी डोके आणि मन इतके हलके झाले की, शहरातील सगळ्या चिंता आणि विचार जणू त्या गंगेच्या प्रवाहात वाहून गेले. तिथे होता फक्त आणि फक्त एक सुखावणारा शांत एकांत. ऋषीकेशची ही शांतता आणि ऊर्जा मनात साठवून मी पुढे निघालो ते पहाडांची राणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मसूरीकडे. ऋषीकेशच्या मैदानी आणि डोंगराळ भागातून मसूरीकडे जाणारा रस्ता म्हणजे निसर्गाच्या एका विस्मयकारक जादूची सुरुवात आहे. जसजशी आमची गाडी उंचावर जाऊ लागली, तसतसे खाली उरलेले जग लहान आणि निसर्गाचे रूप अथांग वाटू लागले. नागमोडी रस्ते, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभे असलेले देवदार आणि पाईनचे उंचच उंच वृक्ष आमचे स्वागत करत होते. मसूरीमध्ये पोहोचताच थंडगार वाऱ्याच्या झुळुकीने मन प्रफुल्लित केले.मसूरीकडे जात असताना रस्त्याच्या कडेला, डोंगरांच्या कुशीत वसलेला मसूरी लेक म्हणजेच मसूरीचा तलाव लागला.( मसूरी की झील.) उंचावरून पाहताना हिरव्यागार दरीच्या मध्यभागी असलेला हा तलाव एखाद्या चमकणाऱ्या नीलमण्यासारखा दिसत होता.जवळपास चाळीस मिनिटे खोल उतरून गेल्यावर हा तलाव आहे. या तलावाच्या परिसरात पाऊल ठेवताच तिथल्या शांत वातावरणाने प्रवासाचा सगळा थकवा दूर केला. तलावाच्या संथ पाण्यात पॅडल बोट चालवत असताना, सभोवतालच्या डोंगरांचे पाण्यात दिसणारे प्रतिबिंब मनाला खूप सुखावून जाते. तलावाच्या आजूबाजूला असलेल्या छोट्या स्टॉल्सवर मिळणारी गरमागरम वडा, आणि चहाचा कप हातात घेऊन थंड हवेत बसण्याचा आणि चहा पिण्याचा आनंद काही वेगळाच होता. सुख म्हणजे नक्की काय असतं...??

तिथून दिसणारे खोऱ्याचे विहंगम दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे होते.मसूरीमधील कॅम्प्टी फॉल्सवर घालवलेला वेळ तर मनावर कायमचा कोरला गेला आहे.अनेक चित्रपटांचे चित्रीकरण तेथे झालेले आहे. डोंगराच्या उंचावरून कोसळणारा तो पांढराशुभ्र पाण्याचा धबधबा निसर्गाच्या अमर्याद ऊर्जेचे प्रतीक वाटत होता. त्या थंडगार पाण्याच्या तुषारांनी अंगाला स्पर्श केला, तेव्हा प्रवासाचा सगळा थकवा पळून गेला. तिथून पुढे आम्ही मसूरीच्या सर्वात उंच ठिकाणी गेलो. तिथून दिसणारे हिमालयाचे बर्फाच्छादित कडे पाहून डोळ्यांचे पारणे फिटले. मसूरीच्या प्रसिद्ध मॉल रोडवर संध्याकाळी फिरताना तिथले प्रसिद्ध विंटर लाईनचे दृश्य पाहायला मिळाले. उत्तराखंडमधील ऋषिकेश हे केवळ योग, अध्यात्मासाठी प्रसिद्ध नाही, तर याच्या आजूबाजूला अनेक सुंदर नैसर्गिक स्थळे देखील आहेत. ऋषिकेशच्या प्रवासात येथील घाट, मंदिरे आणि गंगा आरती पाहण्यासोबतच निसर्गाचा एक अद्भुत चमत्कार अनुभवण्यासाठी पर्यटकांनी आवर्जून भेट द्यावी असे ठिकाण म्हणजे सहस्त्रधारा. सहस्त्रधारा धबधबा आणि गंधकाचे गरम पाण्याचे कुंड ऋषिकेशपासून साधारण ४५ ते ५० किलोमीटर अंतरावर (डेहराडूनजवळ) आहे. सहस्त्रधारा हे पर्यटकांचे एक मुख्य आकर्षण आहे. सहस्त्रधारा याचा अर्थ हजार धाराने वाहणारा झरा असा होतो. येथील चुनखडीच्या डोंगरांमधून शेकडो लहान-मोठे पाण्याचे झरे एकाच वेळी खाली कोसळतात. पावसाळ्यात तर हे दृश्य अत्यंत विहंगम आणि डोळ्यांचे पारणे फेडणारे दिसते.या धबधब्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथील गरम पाण्याचे नैसर्गिक कुंड. या कुंडातील पाण्यात मोठ्या प्रमाणात गंधक () आढळते, ज्यामुळे हे पाणी नैसर्गिकरित्या कोमट असते.आम्ही त्या कुंडातही स्नान केले. अशी धार्मिक आणि शास्त्रीय मान्यता आहे की या गंधकयुक्त पाण्यात स्नान केल्याने त्वचेचे सर्व विकार, सांधेदुखी आणि थकवा दूर होतो. त्यामुळे अनेक पर्यटक येथे केवळ निसर्गसौंदर्य पाहण्यासाठीच नाही, तर या औषधी कुंडात स्नानाचा लाभ घेण्यासाठीही येत असतात.

सूर्यास्ताच्या वेळी आकाशात लाल, पिवळ्या आणि नारंगी रंगांची एक सुंदर रेघ तयार होते, जी पाहताना जाणवले की निसर्ग दररोज आपल्यासाठी किती सुंदर खेळ मांडत असतो.आज आपण सगळेजण सुखाच्या मागे धावत आहोत, पण आपण ते सुख मॉलमध्ये किंवा फाईव्ह स्स्टार मध्ये शोधत आहोत. पैशाने विकत घेतलेला आनंद हा तात्पुरता असतो, पण ऋषीकेशचे आश्रम, नीलकंठची वाट आणि मसूरीच्या,निलकंठेश्वराचे निसर्गात हरवून जाण्यात जो आनंद आहे, तो चिरंतन आणि मोफत आहे. त्यासाठी फक्त पाहायला सुंदर नजर आणि अनुभवायला संवेदनशील मन हवे. निसर्गाच्या या सानिध्यात गेल्यावर मला माझ्या लहानपणीची आठवण आली, जेव्हा आपण मातीत खेळायचो, झाडांशी बोलायचो. आज आपण आणि आपली मुले या आनंदापासून दूर चाललो आहोत. आपण स्वतःला आणि पुढच्या पिढीला पुन्हा या निसर्गाशी जोडले पाहिजे.पण या निसर्गाच्या छायेत वावरताना मनाला एक खंतही वाटली. ज्या निसर्गाने आपल्याला ऋषीकेश, नीलकंठेश्वर आणि मसूरीसारखी स्वर्गीय ठिकाणे दिली, आपण तिथेही प्लास्टिकचा कचरा करून निसर्गाचा समतोल बिघडवत आहोत. आपण हे विसरता कामा नये की, निसर्गाला आपली गरज नाही, तर आपल्याला निसर्गाची गरज आहे. म्हणूनच, या निसर्गाचा आस्वाद घेतानाच त्याचे रक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

शेवटी मला एवढंच वाटतं की, शिवानंद आश्रमातील गंगेचा काठ, नीलकंठच्या पायथ्याशी मिळालेली शांतता, ऋषीकेशची संध्याकाळ आणि मसूरीच्या डोंगरांवरून दिसणारा तो विस्तीर्ण परिसर,सहस्त्रधारा, मनाला एक वेगळीच तृप्ती देऊन गेला. निसर्गाच्या या अथांग छायेत वावरताना मनातील सर्व चिंता आणि ताणतणाव वितळून जातात आणि उरतो तो फक्त आणि फक्त आनंद. मग वाटते.. आनंद सोडूनी जाऊ कुठे सांगा.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि।जळगांव.**
**८९९९५६६९१७**

## जालन्यात आज सकल मराठा समाज संवाद मेळावा

*आ. संजय कुटे, आ. अर्जुनराव खोतकर, आ. नारायण कुचे, आ. हिकमत उढाण यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार; पत्रकार-संपादकांचाही होणार गुणगौरव*






**जालना - प्रतिनिधी**

छत्रपती व्ही. के. फाउंडेशन आणि छावा महाराष्ट्र सेना, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सकल मराठा समाज संवाद मेळावा तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार व गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता भाग्यनगर येथील मराठा सेवा संघ कार्यालयात हा कार्यक्रम होणार आहे. शेतकरी, नागरिक तसेच समाजाच्या मूलभूत प्रश्नांना विधानसभेत प्रभावीपणे वाचा फोडून न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करणारे जलसम्राट आ. डॉ. संजय कुटे, आ. अर्जुनराव खोतकर, आ. नारायण कुचे आणि आ. हिकमत उढाण यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास माजी मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. संजय कुटे, माजी मंत्री तथा अंदाज समिती प्रमुख आ. अर्जुनराव खोतकर, घनसावंगीचे आ. हिकमत उढाण, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे तसेच पक्षाचे प्रवक्ते विनोद वाघ हे विशेष अतिथी व सत्कारमूर्ती म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात जालना महानगरपालिकेचे महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सभापती संध्याताई देठे, सुनील बापू आर्दड, मा. उपनगराध्यक्ष भास्कर आबा दानवे शहर जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी प्रा. सोपानराव तेलगढ मा. जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ जालना विष्णूभाऊ पाचपुले, शिवसेनेचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, मल्हार योद्धा दीपकभाऊ बोऱ्हाडे, पंचायत समिती जालना सभापती मुरली आबा थिटे, किशोर पाटील शिरावत, संस्थापक अध्यक्ष छावा महाराष्ट्र सेना, जिल्हाध्यक्ष ज्योतीराम माने, अंकुश भाऊ चव्हाण खोतकर समर्थक संस्थापक कोषाध्यक्ष संभाजी ब्रिगेड संतोष गाजरे, प्राचार्य डॉ. प्रसाद मदन, प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. अरविंद मुरमे, सभापती सुजित जोगस, नगरसेविका सुलोचना गोर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य कल्पनाताई शिंदे, महानगरपालिका गटनेते महेश निकम, मा. जिल्हा परिषद सदस्य कृष्णा जाधव, मराठा महासंघाचे कोषाध्यक्ष अशोकराव पडुळ, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष कैलाश खांडेभराड, पंचायत समिती बदनापूर सभापती संजय जगदाळे, शिवसेना तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते रामप्रसाद बोराडे, पंचायत समिती सदस्य अरुण डोळसे, जिल्हा परिषद सदस्य गणेशराव डोळस, सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय लोढे, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक प्रशांत वाडेकोर, शंकरराव बेंदरे, बाबुराव शिंदे, नगरपंचायत बदनापूरचे गटनेते बाबासाहेब कराळे आणि सुमन ताई शेळके उद्योजक अंबड,संभाजी ब्रिगेडच्या विभावरी ताकट यांचा गौरव करण्यात येणार आहे. समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्यासह पत्रकारितेच्या माध्यमातून जनहिताचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकार व संपादकांचाही यावेळी गुणगौरव करण्यात येणार आहे. पत्रकार परिषद जालनाचे अध्यक्ष अंकुश आप्पा देशमुख, प्रेस क्लब जालनाचे अध्यक्ष मकरंद जागिरदार, व्हॉइस ऑफ मीडियाचे अध्यक्ष राजेश भालेराव, प्रेस कौन्सिलचे अध्यक्ष दीपक शेळके, ज्येष्ठ पत्रकार शेख महेमुद, संपादक भरत मानकर, संपादक संतोष भुतेकर, संपादक अविनाश कव्हळे, संपादक मनोज कोलते पाटील, संपादक अर्पण गोयल, आमिर खान, अंकुश गायकवाड, अलमखान पठाण, उपसंपादक संजय शेलकर, पत्रकार संजय उनगे, पत्रकार सुनील डोळसे, रवि शिंदे आणि संपादक विकास बागडी यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. सकल मराठा समाजातील विविध प्रश्न, शेतकरी आणि नागरिकांच्या समस्या, सामाजिक व शैक्षणिक प्रश्न तसेच समाजाच्या भविष्यातील वाटचालीबाबत या संवाद मेळाव्यात विचारविनिमय होणार आहे. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या मान्यवरांची उपस्थिती आणि समाजातील नागरिकांशी थेट संवाद हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

कार्यक्रमास सकल मराठा समाजातील नागरिकांनी सहकुटुंब, सहपरिवार व मित्रपरिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती व्ही. के. फाउंडेशनचे अध्यक्ष तथा प्रेस क्लब जालना सचिव विष्णू कदम आणि छावा महाराष्ट्र सेनेचे युवक अध्यक्ष निखिल वीर यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. सोपन एखंडे, बाबासाहेब बुटरे, राम उजेड, उद्धवराव गुळमकर आणि भागवत काळे यांच्यासह अमोल जाधव हे संयोजनाची जबाबदारी पाहत आहेत. श्रावण भुजोड, नामदेव काळे, शंकर जाधव, राजाभाऊ गुलगे, बळीराम घाटे, लक्ष्मण काटे, डॉ. सुभाष बीटले, गणपत जाधव, प्रकाश मस्के, अशोक काळे, रामजी कोरडे आणि प्रभाकर शिंदे यांच्यासह कार्यकर्ते कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेत आहेत.

## शिक्षक : ज्ञानदानातून राष्ट्रनिर्मिती करणारा शिल्पकार

५ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस शिक्षकांना समर्पित करण्यात आला आहे. शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच शिक्षणाचे आणि शिक्षकांच्या भूमिकेचे समाजातील महत्त्व अधोरेखित करण्याचा हा दिवस आहे. शिक्षक दिन हा केवळ शुभेच्छा देण्याचा किंवा औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून, शिक्षकांच्या योगदानाचा आणि राष्ट्रनिर्मितीतील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा विचार करण्याचा दिवस आहे.

शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकातील धडे शिकवणारा व्यक्ती नसतो, तर तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा शिल्पकार असतो. आई-वडिलांनंतर मुलांच्या जीवनावर सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची जिज्ञासा निर्माण करणे, त्यांना योग्य-अयोग्याची जाणीव करून देणे, आत्मविश्वास वाढविणे, शिस्त लावणे आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना निर्माण करणे, हे शिक्षकांचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. म्हणूनच शिक्षकाला समाजात केवळ 'शिक्षक' म्हणून नव्हे, तर भावी पिढीचा मार्गदर्शक म्हणून पाहिले जाते.

भारतीय संस्कृतीत गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'गुरू' म्हणजे अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखविणारा. पूर्वीच्या गुरुकुल परंपरेत गुरू-शिष्य नाते अत्यंत पवित्र मानले जात होते. गुरू केवळ शिक्षण देत नव्हते, तर शिष्याला जीवन जगण्याची कला, कर्तव्याची जाणीव, संयम, शिस्त आणि मूल्यांची शिकवण देत होते. काळ बदलला, शिक्षणाच्या पद्धती बदलल्या आणि तंत्रज्ञानाने शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. मात्र गुरूचे महत्त्व आजही कमी झालेले नाही.

आज मोबाईल, इंटरनेट, संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे माहितीचा प्रचंड साठा विद्यार्थ्यांच्या हातात उपलब्ध आहे. काही सेकंदांत जगभरातील माहिती मिळू शकते. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देण्यापुरती राहिलेली नाही. उपलब्ध माहितीचे विश्लेषण कसे करावे, योग्य आणि अयोग्य माहितीतील फरक कसा ओळखावा, अफवा आणि तथ्य यांची चिकित्सा कशी करावी, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर कसा करावा, हे शिकविणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. या बदलत्या परिस्थितीत शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक, समुपदेशक आणि मूल्यशिक्षक म्हणून अधिक महत्त्वाचा ठरतो.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे स्वतः एक महान शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि राष्ट्र घडविण्याची शक्ती त्यांनी ओळखली होती. शिक्षक ते राष्ट्रपती असा त्यांचा प्रेरणादायी प्रवास त्यांच्या असामान्य कर्तृत्वाची साक्ष देतो. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा सन्मान करण्यासाठी साजरा होणारा शिक्षक दिन प्रत्येक शिक्षकाच्या योगदानाची जाणीव करून देतो.

आज शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. विद्यार्थ्यांवरील वाढता शैक्षणिक ताण, स्पर्धेची मानसिकता, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, मोबाईलचे व्यसन, बदलती कौटुंबिक परिस्थिती आणि नैतिक मूल्यांपासून दूर जाण्याची प्रवृत्ती यामुळे शिक्षकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. विद्यार्थ्यांना केवळ चांगले गुण मिळवून देणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असू शकत नाही. त्यांच्यामध्ये माणुसकी, संवेदनशीलता, प्रामाणिकपणा, सहकार्याची भावना, पर्यावरणाबद्दलची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे.

आजच्या काळात शिक्षकांनी स्वतःलाही सतत अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. नवनवीन तंत्रज्ञान, डिजिटल शिक्षणपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर करून अध्यापन अधिक परिणामकारक करता येऊ शकते. मात्र तंत्रज्ञान हे शिक्षकाची जागा घेणारे साधन नसून शिक्षकाला अधिक सक्षम करणारे माध्यम आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न समजून घेणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि त्यांना योग्य दिशा देणे हे मानवी नाते तंत्रज्ञान कधीही पूर्णपणे बदलू शकत नाही.

शिक्षकांच्या कार्याचा सन्मान केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी पुष्पगुच्छ देऊन किंवा शुभेच्छा संदेश पाठवून होऊ शकत नाही. शिक्षकांना समाजात योग्य प्रतिष्ठा, सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यपरिसर, आवश्यक शैक्षणिक साधने आणि प्रशिक्षणाच्या संधी मिळणे आवश्यक आहे. शिक्षकांवर अनावश्यक प्रशासकीय कामांचा भार टाकण्यापेक्षा त्यांना अध्यापनासाठी अधिक वेळ आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. कारण शिक्षक जितका सक्षम असेल, तितकी भावी पिढी अधिक सक्षम होईल.

विद्यार्थ्यांच्या जीवनात काही शिक्षक कायमचे लक्षात राहतात. त्यांच्या एखाद्या वाक्याने, दिलेल्या प्रोत्साहनाने किंवा दाखविलेल्या योग्य मार्गाने विद्यार्थ्याचे संपूर्ण आयुष्य बदलू शकते. एखादा विद्यार्थी अडचणीत असताना त्याच्या पाठीशी उभा राहणारा शिक्षक त्याच्यासाठी केवळ शिक्षक राहत नाही, तर आयुष्यभराचा मार्गदर्शक बनतो. म्हणूनच अनेक यशस्वी व्यक्ती आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांबरोबरच शिक्षकांनाही देताना दिसतात.

शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा, गुण आणि प्रमाणपत्रे नव्हेत. शिक्षण म्हणजे विचार करण्याची क्षमता, प्रश्न विचारण्याचे धैर्य, निर्णय घेण्याची विवेकबुद्धी आणि जबाबदारीने जगण्याची जाणीव होय. या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे कार्य शिक्षक करतात. त्यामुळे शिक्षक हा समाजाच्या भविष्याचा शिल्पकार आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही.

शिक्षक घडवतो विद्यार्थी, विद्यार्थी घडवतो समाज आणि समाज घडवतो राष्ट्र. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता वर्षभर त्यांच्या कार्याचा आदर केला पाहिजे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ झाले पाहिजे. पालक, शिक्षक आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे काम केल्यासच संस्कारक्षम, विवेकी आणि जबाबदार पिढी घडू शकते.

आज शिक्षक दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या जीवनात दिशा देणाऱ्या शिक्षकांचे स्मरण करावे. त्यांच्या शिकवणीतील एखादा संस्कार आपल्या आचरणात आणणे, हाच त्यांच्याप्रती खरा आदर ठरेल. ज्ञानाचा दीप तेवत ठेवणाऱ्या, अज्ञानाचा अंधार दूर करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणाऱ्या सर्व शिक्षकांना मनःपूर्वक अभिवादन!

शिक्षक म्हणजे ज्ञानाचा दीप, संस्कारांची शिदोरी आणि राष्ट्रनिर्मितीचा भक्कम आधारस्तंभ. शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# तालुक्यातील विविध विकासकामे कधी पूर्ण करणार? तालुका शिवसेनेच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

**दत्ता देशमुख**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त, तालुक्यातील विकास ''तुमसे न हो पायगा'' यासाठी तालुका शिवसेनेच्या वतीने तालुक्यातील शासनाच्या विविध योजनांमधून सुरू करण्यात आलेली विकासकामे अनेक ठिकाणी अर्धवट अवस्थेत आहेत. ही कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा देत शिवसेनेच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यात शासनामार्फत विविध योजनांमधून विकासकामे मंजूर करून सुरू करण्यात आली आहेत. मात्र, अनेक कामे आजघडीला अर्धवट असून ती लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत. कामे पूर्ण



न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील, असा इशारा देण्यात आला आहे.

तालुक्यातील प्रमुख मागण्यांमध्ये शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा करणार का?, जाफराबाद शहराची पाणी पुरवठा योजना कधी पूर्ण करणार का?, यासह सोनेखेडा येथील साठवण तलावातील बॅक वॉटर क्षेत्रातील बाधित शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यात याव्या. नदीवरील पुलाचे कामही तातडीने पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावावा, तसेच पिक विमा कंपनीने पिक विमा भरण्यासाठी पोर्टलवर मंजूर विमा दाखवून परत नामंजूर दाखवण्याच्या प्रकाराची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. फसव्या पद्धतीने शेतकऱ्यांची अडवणूक होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, असे निवेदनात नमूद आहे. तर अर्धवट राहिलेली सर्व विकासकामे तातडीने पूर्ण करून नागरिक व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा; अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी निवेदन स्वीकारतांना तहसील कार्यालयाचे प्रतिनिधी तथा महसूल कर्मचारी श्री धनराज भुते, तर उपस्थितांमध्ये शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश पा गव्हाड, तालुका प्रमुख कुंडलिक पा मुठ्ठे, माजी तालुका प्रमुख शिवाजीराव गावंदे,माजी जि.प. अध्यक्ष उत्तमराव वानखेडे, युवासेनेचे जिल्हा प्रमुख मंगेश गव्हाड, तालुका युवा *(पान २ वर)*

# शिक्षक दिनानिमित्त हिंदू समाज संस्थेतर्फे शिक्षकांचा सत्कार

**दत्ता देशमुख**

भारताचे माजी राष्ट्रपती व महान तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षक दिन साजरा करण्यात येतो. याच औचित्याने हिंदू समाज संस्था संचलित कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालय व रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालय, जालना येथे शिक्षकांच्या सन्मानार्थ विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे डॉ. विनायक दसरे होते. यावेळी संस्थेचे सचिव चंद्रशेखर वाघमारे, उपाध्यक्ष भगवान धोत्रे, संचालक रावसाहेब




अवघड, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती मीनाक्षी कुलकर्णी, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा देव तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस व सरस्वतीच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

सन २०२५ मध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात *(पान २ वर)*

# काळेगाव येथील जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी गणेश रतन चव्हाण व उपाध्यक्षपदी फजलुद्दीन अकबर शहा यांची बिनविरोध निवड



**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी येथून जवळच असलेल्या नुकतीच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा काळेगाव येथे शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठण बाबत पालक सभा घेण्यात आली. सर्वानुमते शाळा व्यवस्थापन समिती बिनविरोध निवडण्यात आली. समितीचे अध्यक्ष श्री गणेश रतन चव्हाण तर उपाध्यक्ष म्हणून फजलुद्दीन अकबर शहा यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून राजेश अशोकराव चव्हाण, शेख महेमूद शेख हमीद, आम्रपाली दीपक इंगळे, सविता विठ्ठल चव्हाण, रईसाबी एजाज शहा, अनिता दादाराव बरडे, ज्योती भानुदास आघाम, अनिता शंकर शिंदे, शिक्षणतज्ञ म्हणून दिनकर आश्रुबा चव्हाण, स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधी शेख नाजीम शेख शरीफ शिक्षक प्रतिनिधी एस.ई. डोईफोडे तर सचिव म्हणून मुख्याध्यापक दीपक मुळे यांची निवड करण्यात आली. पालकसभेस सरपंच वसंतराव चव्हाण, उपसरपंच वाहेदभाई शेख, मा.उपसरपंच नाजीम शेख,आयाज शहा,छगन इंगळे व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. समिती स्थापनेसाठी धनंजय मुळे, दीपक मुळे, प्रमोद डोईफोडे ,संजय डोईफोडे मनीषा वायाळ यांनी परिश्रम घेतले.

# जालन्यात ब्राह्मण समाजाचे दीपक रणनवरे यांचे आमरण उपोषण मागे

## भाजप प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांच्या मध्यस्थीला यश; मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत लवकरच बैठक

**जालना - प्रतिनिधी**

ब्राह्मण समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी गेल्या पाच दिवसांपासून जालना शहरातील गांधी चमन येथे आमरण उपोषणाला बसलेले समाजनेते दीपक रणनवरे यांनी अखेर आपले उपोषण मागे घेतले. भाजपचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी उपोषणस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन शासन आणि आंदोलक यांच्यात समन्वय साधल्याने या आंदोलनाची सांगता झाली.

उपोषणाच्या सहाव्या दिवशी रणनवरे यांची प्रकृती खालावल्याची माहिती मिळाल्यानंतर राम कुलकर्णी यांनी या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेतली. त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या निदर्शनास ब्राह्मण समाजाच्या मागण्यांचा विषय आणला. त्यानंतर कुलकर्णी यांनी स्वतः जालना येथे येऊन गांधी चमन येथील उपोषणस्थळी भेट




दिली.

यावेळी कुलकर्णी यांनी दीपक रणनवरे यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या मागण्या शासनाच्या संबंधित विभागांपर्यंत प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. शासनाचे प्रतिनिधी म्हणून निवासी जिल्हाधिकारी श्री. रामदास दौंड , पोलिस उप अधीक्षक अनंत कुलकर्णी, तहसीलदार धैर्यशील गवळी उपस्थित होते. त्यांनी रणनवरे यांच्या मागण्या शासन दरबारी मांडण्याचे लेखी आश्वासन दिले.

**मुख्यमंत्र्यांसोबत लवकरच बैठक**

ब्राह्मण समाजाच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मुंबईत लवकरच बैठक आयोजित करण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले. शासन सकारात्मक भूमिका घेत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर रणनवरे यांनी आपले आमरण उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला.

दीपक रणनवरे यांनी उपोषणादरम्यान परशुराम आर्थिक विकास महामंडळाला पुरेसा निधी उपलब्ध करून देणे, महामंडळावर अशासकीय सदस्य व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणे, ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, ईडब्ल्यूएस आरक्षणाची उत्पन्न मर्यादा वाढविणे तसेच विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे मोफत सुरू करणे आदी मागण्या शासनाकडे केल्या होत्या. गेल्या सहा दिवसांपासून अन्नत्याग केल्यामुळे रणनवरे यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला होता. त्यामुळे या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप होणे आवश्यक होते. राम कुलकर्णी यांनी केलेल्या मध्यस्थीमुळे शासनाचे प्रतिनिधी आणि आंदोलक यांच्यात सकारात्मक चर्चा झाली आणि आंदोलनाची कोंडी फुटली.

यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन दीपक रणनवरे यांनी आमरण उपोषण सोडल्याची घोषणा केली. *(पान २ वर)*

# कर्मचारी हितासाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ सक्षमपणे काम करणार -जिल्हाध्यक्ष विनोद भगत

**जालना -प्रतिनिधी**

कर्मचारी यांच्या न्याय्य हक्कांसाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ सातत्याने प्रयत्नशील असून, कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने संघटनेचे कार्य आगामी काळात अधिक जोमाने व पूर्ण क्षमतेने करण्यात येईल. संघटनेची ताकद वाढविण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने व समन्वयाने काम करावे, असे आवाहन महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनोद भगत यांनी केले.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कृष्णा इंगळे



यांच्या आदेशानुसार तसेच गणेश मडावी, सुमित भाऊ भुईंगळ, प्रभाकर सोनडवले व सुशील बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद येथे आयोजित बैठकीत भगत बोलत होते. यावेळी भानुदास काळे, सरोज बिडला, राम पवार, नितीन श्रीमंगले, राजू पवार, ओबेद कुरेशी, राहुल लालझरे, आकाश बरे, रामेश्वर जावळे, दिलीप चव्हाण यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत संघटनेच्या आगामी कार्याची दिशा, कर्मचारी यांच्या विविध समस्या तसेच संघटनात्मक बांधणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांमधील समन्वय वाढवून संघटनेचे कार्य तळागाळातील कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार असून संघटनेचे कार्य हे कर्मचारी यांच्या समर्पण, मेहनत आणि एकजुटीवर अवलंबून असते. प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून कर्मचारी यांच्या प्रश्नांसाठी सक्रियपणे काम करावे असेही भगत यांनी आवाहन केले.

विविध पदांवर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

बैठकीदरम्यान कास्ट्राईब कर्मचारी *(पान २ वर)*

# इस्कॉनतर्फे रथयात्रा; टाळ-मृदंगाचा गजर, श्रीकृष्णाच्या नामस्मरणाने परिसर भक्तिमय

## हरे कृष्णच्या जयघोषाने टेंभुर्णी दुमदुमले

**दत्ता देशमुख**

हरे कृष्ण, हरे कृष्ण या महामंत्राच्या जयघोषाने श्रीकृष्ण नामस्मरणाने टेंभुर्णी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) च्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त गावातून श्रीकृष्णाची भव्य रथयात्रा काढण्यात आली. रथयात्रेत



मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष, श्रीकृष्णाच्या नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. जन्माष्टमीनिमित्त इस्कॉनच्या वतीने जपा सेशन, मंगल आरती, नगर संकीर्तन, श्रीकृष्ण अभिषेक, प्रवचन, महाआरती तसेच महाप्रसाद आदी विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. सायंकाळी संत सावता मंगल कार्यालय येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह श्रीकृष्ण जन्माष्टमीचे महत्त्व सांगणारे प्रवचन झाले. इस्कॉनचे रास गोविंद प्रभू आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) च्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीचे महत्त्व विशद केले. भगवान श्रीकृष्ण सर्वव्यापी देवता आहेत. प्रत्येकाने श्रीकृष्णाच्या भक्तीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. भगवान श्रीकृष्ण हे विष्णूचा अवतार आहेत. भगवंताने आपल्या इच्छेनुसार देवकीच्या पोटी अवतार घेतला. श्रीकृष्णाच्या जन्मावेळी देवकी माता अत्यंत प्रज्वलित झाल्या होत्या. *(पान २ वर)*

# शंभर टक्के उपस्थितीबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक: 'द न्यू इकराटेक्नो इंग्लिश स्कूल'चा उपक्रम

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी - गावासह नातेवाईकांकडून कौतुकाचा वर्षाव 'द न्यू इकराटेक्नो इंग्लिश स्कूल (..)' मध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील ऑगस्ट २०२६ या महिन्यात उत्कृष्ट उपस्थिती दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शाळेतील विद्यार्थिनी खान मुबशिरा आणि छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील शाळेत शिक्षण घेणारी, माजी उपसरपंच फैजल चाऊस यांची मुलगी मरियम फैसल चाऊस यांनी ऑगस्ट २०२६ या महिन्यात १००% उपस्थिती (१००% ) नोंदवून + ग्रेड पटकावला आहे. या दोन्ही विद्यार्थिनींनी दाखवलेली अभ्यासातील चिकाटी, नियमितता आणि शिस्त याबद्दल शाळा प्रशासनाकडून त्यांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये नियमित शाळेत येण्याची सवय लागावी आणि अभ्यासाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेच्या अकॅडमिक एक्सलन्स ट्रॅकर अंतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला होता.

टेंभुर्णी गावात आनंदाचे वातावरण: मरियम फैसल चाऊस हिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे मूळ गाव टेंभुर्णी येथील माजी उपसरपंच फैसल चाऊस यांची मुलगी आहे (तालुका जाफराबाद, जिल्हा जालना) येथे आनंदाचे वातावरण पसरले आहे. तिच्या या चमकदार कामगिरीबद्दल टीपूरणी गावातील सर्व नातेवाईक, कुटुंबिय आणि ग्रामस्थांनी तिच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन तिचे व तिच्या पालकांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले व भरभरून कौतुक केले.

विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक आणि टीपूरणी ग्रामस्थांनी खान मुबशिरा व मरियम फैसल चाऊस यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी उज्वल शुभेच्छा दिल्या आहेत.

# धनादेश अनादर प्रकरणी आरोपीला एक वर्ष कारावास

**जालना - प्रतिनिधी**

भूखंड खरेदीच्या व्यवहारानंतर परतफेडीसाठी दिलेला धनादेश खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने अनादरीत झाल्याच्या प्रकरणात मा. ६ वे न्यायदंडाधिकारी, जालना यांनी आरोपी सिताराम उत्तम पवार (रा. निरखेडा तांडा, ता. जि. जालना, ह.मु. विद्युत कॉलनी, जुना जालना) यांना दोषी ठरवून एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच तीन महिन्यांच्या आत ५ लाख ८० हजार रुपये दंड व नुकसानभरपाईची रक्कम फिर्यादीस देण्याचे आदेश दिले असून, दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त चार महिने कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

फिर्यादी कचरूलाल तुळशीराम गजरे, रा. जालना यांनी आरोपी सिताराम पवार यांना भूखंड खरेदीपोटी ९ लाख ९९ हजार ८६० रुपये दिले होते. मात्र सदर भूखंडाचा व्यवहार रद्द झाल्यानंतर रक्कम परत करण्याचे ठरले. त्यापैकी अंशतः रक्कम परतफेड करण्यासाठी आरोपीने ॲक्सिस बँक, जालना शाखेचा ४ लाख रुपयांचा धनादेश फिर्यादीस दिला होता.

फिर्यादीने सदर धनादेश विश्वासाने बँकेत वटविण्यासाठी सादर केला असता, आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्याने धनादेश अनादरीत झाला. त्यानंतर *(पान २ वर)*

# बैलपोळा निमित्त परंपरेचे जतन



**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील कुंभार गल्ली परिसरात बैलपोळा सणाच्या पार्श्वभूमीवर शाळेतील मुलीने आई-वडिलांना थोडं हातभार म्हणून उत्साहाने मातीचे बैल तयार करताना दिसत आहेत. महाराष्ट्रातील संस्कृती बैलपोळा सणाची परंपरा जपण्यासाठी ही चिमुकली मातीच्या बैलांना रंगरंगोटी देत असून,या उपक्रमातून संस्कृती आणि कलेचे जतन केले जात आहे.

**छाया नागेश बेनिवाल**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.